# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>
## कार्यकारीणी सभा

**दिनांक** : मंगळवार 14 एप्रिल 2015
**स्थळ** : 14 कर्मचारी निवास, शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी – पूर्व, मुंबई – 400 053

उपस्थिती

| | |
|---|---|
| 1. श्री सुनिल सदानंद राणे | 5. श्री रंजन रावजी म्हसकर |
| 2. श्री उदय भगवान राणे | 6. श्री विश्वनाथ राणे |
| 3. श्री दशरथ दत्ताराम साटम | 7. श्री लवू शिवाजी राणे |
| 4. श्री पांडूरंग सावजी राणे | |

फळसेवाडी हितकारी संस्था यांची सभा मंगळवार दिनांक 14 एप्रिल 2015 रोजी संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांच्या घरी सायंकाळी 05:00 वाजता आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस वरील सभासद उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे गावी गेले असल्यामुळे श्री पांडूरंग सावजी राणे यांना अध्यक्ष स्थान देण्यात आले. वाडीतील रस्ता व पाणी यावर चर्चा झाली. श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी व श्री उदय भगवान राणे यांनी अशी सूचना केली की आपण आता गावी जात आहात त्यावेळी बोअर / विंधन विहीरीबद्दल पूर्ण माहीती घ्या व संस्थेस कळवा जेणेकरून पुढील निर्णय घेता येईल.

विहीरीबद्दल गावी श्री रत्नाकर नाना राणे यांना फोन करून माहीती घेतली व त्याबाबतीत मदत करण्यास सांगितले. श्री रत्नाकर नाना राणे यांनी रस्त्याबद्दल माहीती दिली की 15 मे पर्यंत गाडीतळ ते साटम यांच्या माडापर्यंत रस्त्याचे खडीकरण पुर्ण होईल.

संस्थेचे चिटणीस यांनी पाऊलवाटे संबधीत उपसरपंच श्री तुकाराम पालकर यांनी दिलेली माहीती सर्वांना सांगितली.

सभा सायंकाळी 07:30 वाजता अध्याक्षांचे आभार मानुन संपन्न झाली. यावेळी चहापाणी खर्च श्री उदय भगवान राणे यांनी केला त्यांचे आभार मानले.

---